Scan QR code to visit ... Epaper Portal

www.sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२९ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## गुंड असिफ दाढी अजित पवारांना भेटला

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनी कुख्यात गुंड गजानन मारणे याची भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली. पार्थ पवार कुख्यात गुंड गजा उर्फ गजानन मारणे यांना भेटल्याबद्दल त्याला विचारणा करणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले होते. त्यांनी स्वत:च्या मुलास फटकारले आहे, असे अजिबात घडता काम नये, असे बजावले होते. परंतु स्वत: अजित पवार यांना पिंपरी चिंचवडमधील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या असिफ महंमद इक्बाल शेख उर्फ असिफ दाढी काही दिवसांपूर्वी जाऊन भेटला उपमुख्यमंत्री अजित पवार यांची त्याने भेट घेतल्याचा फोटो समोर आल्याने खळबळ उडाली होती



## रोहित पवारांचा अजित दादांवर गंभीर आरोप

## मला अडचणीत आणण्यासाठी

# माझ्या काकांनी मतदारसंघातील गुंडांना देखील जवळं केलं

**मुंबई**–देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे पूर्वीपासूनच गुंडांना भेटत असावेत. मला वाईट याचं वाटतं की, आमच्या काकांनीसुद्धा मला अडचणीत आणण्यासाठी माझ्या मतदारसंघातील गुंडाला जवळ केलं आहे. ही तुमची वृत्ती आहे, असा खोचक सवाल करत आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर आरोप केला आहे. ते विधानभवनात पत्रकारांशी बोलत होते.

रोहित पवार म्हणाले की, जरांगे यांच्या आंदोलनावर एसआयटी स्थापनेचा निर्णय घेतला. मुळात एसआयटीचा मुद्दा कोणी मांडला? भाजपाच्या आमदाराने मांडला. एसआयटी कोणी गठीत केली? तर एसआयटी भाजपाच्या अध्यक्षांनी गठीत केली. अशा परिस्थितीत टार्गेट कोणाला केला जातोय? त्यामुळे भाजपाचे टार्गेट एकनाथ शिंदे तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतोय.गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदेंना गुंड भेटतात. देवेंद्र फडणवीसांना गुंड भेटतात. अजितदादांना गुंड भेटतात. मग लोकसभेला महायुतीतील नेते काय आता गुंडाचा वापर करणार आहात का? असा थेट सवाल रोहित पवारांनी अजित पवारांसह अन्य नेत्यांना केला.

# उद्धव ठाकरे यांना त्यांचा मुलगा मुख्यमंत्री व्हावा असं वाटतंय

### अमित शहा यांचा महाविकास आघाडीसह ठाकरेंवर निशाणा




**मुंबई**–उद्धव ठाकरे यांना त्यांचा मुलगा मुख्यमंत्री व्हावा असे वाटत असल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे. एका खासगी वृत्त वाहिनीच्या सत्ता संमेलनात अमित शहा बोलत होते. यावेळी त्यांनी महाविकास आघाडी आणि देशातील इंडिया आघाडीवर जोरदार टीका केली. इंडिया आघाडी म्हणजे घराणेशाही पुढे नेणारी आघाडी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिवसेना – भाजपची युती तुटल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत महाविकास आघाडी स्थापन केली आहे. या आघाडीचा उद्देश केवळ घराणेशाही पुढे नेणे असल्याचे शहा यांनी म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी या कार्यक्रमात राजकीय प्रश्नांना उत्तरे दिली. एखाद्या सिद्धांताच्या आधारावर चालणारा पक्ष असेल तर ठिक आहे. मात्र, महाविकास आघाडीकडे कोणताच सिद्धांत नसल्याने त्यांची आघाडी टिकणार नसल्याचे अमित शहा यांनी म्हटलं आहे. इंडिया आघाडीमध्ये प्रत्येक पक्षाला घराणेशाही पुढे न्यायची आहे. सोनिया गांधी यांचे लक्ष राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्याचे आहे. त्यांनी तसा २१ वेळा प्रयत्न देखील केला असल्याची टीका अमित शाह यांनी केली. तर उद्धव ठाकरे यांना देखील त्यांचा मुलगा आदित्य ठाकरे याने मुख्यमंत्री व्हावे असे वाटते. तसेच स्टॅलीन यांनाही मुलगा मुख्यमंत्री व्हावा तसेच ममता बॅनर्जी यांना भाचीला सत्तेत आणायचे आहे. लालू यांनाही तेच करायचं असल्याचे शहा यांनी म्हटले आहे. अमित शहा यांनी इंडिया आघाडीतील सर्व लोकांना आपापल्या कुटुंबाला सत्येत आणायचे असल्याची टीका अमित शहा यांनी इंडिया आघाडीवर केली आहे.राज्यातील सत्ता संघर्षानंतर देशपातळीवर व्यवस्थापन झालेल्या इंडिया आघाडीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जोरदार हल्ला चढवला. आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व विरोधी पक्षांनी मिळून इंडिया आघाडीची स्थापना केली आहे. इंडिया आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्याचा निर्धार सर्वच विरोधी पक्षांनी केला आहे. या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीवरच केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी हल्ला चढवला. ही आघाडी टिकणार नसल्याचा दावा देखील अमित शहा यांनी केला आहे.

## इथला निजामी मराठा तुम्हाला कधी संपवेल, हे तुम्हालाही कळणार नाही:जरांगेंना निवडणुकीत उभे राहण्याचा प्रकाश आंबेडकरांचा सल्ला

**पुणे**–निवडणुकीत उभे राहिले नाही तर इथला निजामी मराठा तुम्हाला कधी संपवेल, हे तुम्हालाही कळणार नाही. अशा शब्दात प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना सल्ला दिला आहे. आंदोलन संपवायचे नसेल तर निवडणुकीत उभे राहण्याशिवाय पर्याय नाही, असे देखील वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. आरक्षणाचा प्रश्न शांततेत सोडवता आला असता. मात्र ओबीसी विरुद्ध मराठा वाद लावण्यात आला असल्याची टीका त्यांनी केली. मात्र, आता मनोज जरांगे पाटील यांच्यासमोर निवडणुकीला उभे राहिल्याशिवाय पर्याय नाही, असे देखील ते म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी जालना लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, असा सल्ला प्रकाश आंबेडकर यांनी याआधी देखील दिला होता. तसेच बीड लोकसभा मतदारसंघातून मनोज जरांगे पाटील निवडणुकीला सामोरे जाऊ शकतात, अशी चर्चा देखील मधल्या काळात रंगली होती. त्यामुळे मनोज जरांगे पाटील हे राजकारणात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मधल्या काळात महाविकास आघाडीच्या वतीने देखील मनोज जरांगे पाटील लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची चर्चा रंगली होती.



त्यातच आता प्रकाश आंबेडकर यांनी देखील त्यांना लोकसभा निवडणुकीत उभे राहण्याचा सल्ला दिला आहे.निवडणुकीत उभे राहिले नाही तर इथला निजामी मराठा तुम्हाला कधी संपवेल हे तुम्हाला सुद्धा कळणार नाही. गरिबांच्या चळवळी कधीच उभ्या राहू दिला जात नाहीत. आपण गरिबांच्या आणि अपेक्षितांच्या चळवळी उभ्या करत आहात. या चळवळीमध्ये एकजूट होणे महत्त्वाचे असल्याचे ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. आगामी काळातील येणारी निवडणूक सत्तेवर कोणाला बसवायचे याची निवडणूक नसून आपले अधिकार शाबूत ठेवण्याची लढाई असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. त्यामुळे त्यासाठी आतापासून सावध राहण्याचा सल्ला देखील आंबेडकरांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे.

## माजी खासदार नीलेश राणे यांना झटका

# पुणे महापालिकेने केली मालमत्ता सील, सुमारे साडे ३ कोटींचा कर थकवल्याचा आरोप

**पुणे**–केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे सुपुत्र तथा भाजपचे माजी खासदार नीलेश राणे यांना पुणे महापालिकेने जोरदार झटका दिला आहे. महापालिकेच्या कर संकलन विभागाने येथील आर डेक्कन मॉलमधील मिळकतीचा सुमारे साडे ३ कोटी रुपयांचा कर थकवल्याप्रकरणी नीलेश राणे यांच्या मालमत्तेला सील ठोकण्याची कारवाई केली आहे. या कारवाईमुळे भाजपच्या गोटात खळबळ माजली आहे.पुण्यातील डेक्कन भागातील आर डेक्कन मॉलमध्ये माजी खासदार नीलेश राणे यांची मालमत्ता आहे. या मालमत्तेचा सुमारे ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांचा कर नीलेश राणे यांनी थकवला होता. या थकबाकीप्रकरणी महापालिकेच्या कर संकलन विभागाने राणे यांना अनेकदा नोटीस बजावली. पण त्यांनी करभरणा केला नाही. अखेर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी नीलेश राणे यांच्या या मालमत्तेला सील ठोकले. यासंबंधीच्या वृत्तानुसार, महापालिकेने नीलेश राणे यांच्या ३ मजल्यांच्या मिळकतीचे वरचे २ मजले सील केले आहेत.उल्लेखनीय बाब म्हणजे महापालिका प्रशासनाकडून अशा कारवाईचा नेहमीच गाजावाजा केला जातो. पण या प्रकरणी करण्यात आलेली कारवाई अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली. यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.पुणे महापालिकेकडून



मालमत्ता कराच्या वसुलीसाठी शहरात धडक मोहीम राबवण्यात येत आहे. या प्रकरणी अनेक मिळकतींना सील ठोकण्याची कारवाई केली जात आहे. या अंतर्गत नीलेश राणे यांच्या मालमत्तेलाही गत २ वर्षांपासून सातत्याने नोटीसा बजावण्यात येत होत्या. पण प्रत्येक नोटीसीनंतर पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात होता. यामुळे प्रशासनाने या प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई केली नव्हती. काही महिन्यांपूर्वी बजावण्यात आलेल्या नोटीसीनंतर थेट महापालिका आयुक्तांनाच आफोन करून कारवाई न करण्याची सूचना करण्यात आली होती. यामुळे कारवाई लांबली. पण अखेर मंगळवारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणी ठोस कारवाई करत नीलेश राणे यांच्या मालमत्तेला सील ठोकण्याचे धाडस दाखवले.

# मनोज जरांगेंना फोन केला हे सिद्ध झालं, तर वाटेल ते मान्य करेन; शरद पवार यांचे प्रत्युत्तर

**मुंबई**–मनोज जरांगे पाटील यांना फोन केल्याचे सिद्ध झाल्यास वाटेल ते मान्य करेल. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचे वक्तव्य पोरकट असल्याची टीका शरद पवार यांनी केली. राजेश टोपे यांच्यावर करण्यात आलेले आरोप देखील शरद पवार यांनी फेटाळून लावले. त्यांना फोन केला हे सिद्ध झालं तर वाटल ते मान्य करेल असे म्हणत शरद पवार यांनी 'कर नाही, त्याला डर कशाला' असे म्हटले आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलना मागे शरद पवार यांचा हात असल्याचा आरोप सत्ताधारी पक्षाच्या वतीने विधिमंडळाच्या सभागृहात करण्यात आला. यावर शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य सरकारवर टीका केली. उलट मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन थांबवण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने राजेश टोपे यांची मदत घेण्यात आली असल्याचे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

शरद पवार म्हणाले की, मी मनोज जरांगे यांना भेटण्यासाठी आंदोलन गेलो होतो. त्यावेळी त्यांना मी सांगितले की, तुमच्या मागण्या लावून धरल्या पाहिजेत. पण दोन समाजामध्ये अंतर वाढेल असे काही तुम्ही करू नका. इतर समाजाप्रती कटुता ही योग्य दिसणार नाही. त्यानंतर माझा त्यांच्याशी कुठलाही संबंध आला नाही. साधे बोलणे देखील नाही.शरद पवार म्हणाले की, जरांगे यांचे आंदोलन थांबले पाहिजे, यासाठी सरकारमधील जबाबदार व्यक्तींनी राजेश टोपे यांच्यांशी संवाद साधला होता. यासंबंधी मला माहिती आहे. एकीकडे त्यांची मदत मागायची आणि दुसरीकडे जरांगे यांच्यावर हल्ला, आरोप करायचा हे योग्य नाही. असे असेल तर उद्या काही प्रश्न निर्माण झाले तर राज्यसरकारशी संवाद कोण करेल, असे शरद पवार म्हणाले.बीडमधून तुम्ही मनोज जरांगे यांना लोकसभेची उमेदवारी देणार आहात, असा आरोप भाजप नेते आशिष देशमुख यांनी केला आहे, असा प्रश्न शरद पवार यांना करण्यात आला. यावर शरद पवार म्हणाले की, कोणी आरोप केला त्यांना मर्यादीत मेंदू असावा, असा टोला त्यांनी देशमुखांना लगावला.यावेळी शरद पवार यांनी एक प्रश्न विचारण्यात आला. विरोधकांनी तुम्हाला बारामती लोकसभा मतदारसंघाच्या प्रचारात अडकवून ठेवण्याचा प्लॅन आखल्याची चर्चा आहे. अशावेळी तुम्ही काय करणार, असे पवारांना विचारण्यात आले.त्याला उत्तर देताना पवारांनी म्हटले की, मी आतापर्यंत एकूण १४ निवडणुका लढलोय. त्यापैकी ७ निवडणुका या लोकसभेच्या होत्या. या १४ निवडणुकांमध्ये मी कधीही अडकून पडलो नाही. मग आता हे काय करणार, असा टोला शरद पवारांनी महायुतीला लगावला.शरद पवार यांनी आज बारामतीमधील कार्यकर्त्यांशी संवाद साधला. याबद्दल त्यांनी सांगितले की, आज बैठकीला बारामतीच्या प्रत्येक मतदारसंघातील कमीत कमी १५० ते २०० कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर एक लक्षात आले की, महाराष्ट्रातील सर्वसामान्य मतदारांना पर्याय हवा आहे. राजकीय पक्ष म्हणून त्याची पूर्तता करणे ही आमची जबाबदारी आहे.बारामतीमधील अनेकांनी सांगितले की, त्यांना काहीजणांकडून दमदाटीचे फोन येत आहेत. काही निमशासकीय कर्मचारी, शैक्षणिक संस्थांमधील कर्मचाऱ्यांना तुम्हाला नोकरीला मुकावं लागेल, अशा धमक्या दिल्या जात आहेत. असं प्रत्यक्षात घडत असेल तर आम्ही त्याच्या खोलात जाऊ. तुम्हाला कोणी दमदाटी करण्याचा आणि दबाव टाकण्याचा प्रयत्न केला असेल तर आम्ही सगळे त्यांच्या पाठिशी उभे राहू. तुम्ही चिंता करु नका. तुम्ही एकटे नाहीत, असे शरद पवारांनी सांगितले.



# जादुई आवाज हरपला!

**प्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांचे दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ७२व्या वर्षी निधन झाले. ते गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होते. त्यांची मुलगी नायब हिने ही माहिती दिली आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा त्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा हा लेख... संपादक.**

गायक पंकज उधास यांना प्रसिद्ध गझल चिठ्ठी आयी हैमधून ओळख मिळाली होती. पंकज उधास यांची मुलगी नायब हिने तिच्या सोशल मीडिया हँडलवर ही त्यांच्या मृत्युबाबतची पोस्ट शेअर केली आहे. पंकज उधास यांचा जन्म दि.१७ मे १९५१ रोजी गुजरातमधील जेतपूर येथे झाला. तीन भावांमध्ये ते सर्वात लहान होते. त्यांचे कुटुंब राजकोटजवळील चरखाडी नावाच्या गावातील एका कसब्यात राहत होते. त्यांचे आजोबा जमीनदार आणि भावनगर संस्थानाचे दिवाणही होते. त्यांचे वडील केशुभाई उधास हे सरकारी कर्मचारी होते, त्यांना इसराज वाजवण्याची खूप आवड होती. त्यांची आई जितुबेन उधास यांना गाण्याची खूप आवड होती. यामुळेच पंकज उधास आणि त्यांच्या दोन्ही भावांचा संगीताकडे नेहमीच कल होता. पंकजजींनी कधीच विचार केला नव्हता की, ते गाण्यातून आपले करियर करतील. त्या काळात भारत आणि चीनमध्ये युद्ध सुरू होते. यावेळी लता मंगेशकर यांचे ऐ मेरे वतन के लोगों हे गाणे रिलीज झाले. पंकजजींना हे गाणे खूप आवडले. त्यांनी हे गाणे कोणाच्याही मदतीशिवाय त्याच ताल आणि सुरात रचले. एके दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांना कळाले की, ते गाण्यात चांगले आहेत, त्यानंतर त्यांना शाळेच्या प्रार्थना संघाचे प्रमुख बनवण्यात आले. एकदा माता राणीची चौकी त्यांच्या कॉलनीत बसली होती. रात्री आरती-भजनानंतर तिथे सांस्कृतिक कार्यक्रम व्हायचा. या दिवशी त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी येऊन त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात गाण्याची विनंती केली. त्यांनी ए मेरे वतन के लोगों हे गाणे गायले. त्यांच्या गाण्याने तिथे बसलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनाही भरभरून दाद मिळाली. श्रोत्यांमधून एक माणूस उभा राहिला आणि त्यांच्यासाठी टाळ्या वाजवून त्यांना ५१ रुपये बक्षीस म्हणून दिले.

पंकज यांचे दोन्ही भाऊ मनहर आणि निर्जल उधास ही संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध नावे आहेत. या घटनेनंतर पालकांना वाटले की, पंकजही आपल्या भावांप्रमाणे संगीत क्षेत्रात अधिक चांगली कामगिरी करू शकतो, त्यानंतर पालकांनी त्यांना राजकोटमधील संगीत अकादमीमध्ये प्रवेश मिळवून दिला. तिथे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पंकज अनेक मोठ्या स्टेज शोमध्ये परफॉर्म करायचे. त्यांना आपल्या भावांप्रमाणे बॉलिवूडमध्ये स्थान निर्माण करायचे होते. यासाठी त्यांना तब्बल ४ वर्षे संघर्ष करावा लागला. या काळात त्यांना कोणतेही मोठे काम मिळाले नाही. कामना या चित्रपटातील त्यांच्या एका गाण्याला त्यांनी आवाज दिला, पण तो चित्रपट फ्लॉप झाला, त्यामुळे त्यांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. काम न मिळाल्याने नाराज होऊन त्यांनी परदेशात जाऊन राहण्याचा निर्णय घेतला. ज्या चित्रपटाच्या गाण्याने लोकप्रियता मिळवली, त्या चित्रपटात काम करण्यास नकार दिला होता. गायनाच्या कलेतून पंकज यांना परदेशात खूप प्रसिद्धी मिळाली. यावेळी अभिनेता आणि निर्माते राजेंद्र कुमार यांनी त्यांची गाणी ऐकली आणि ते खूप प्रभावित झाले. पंकज यांनी गाणे आणि चित्रपटासाठी कॅमिओही करावा, अशी



त्यांची इच्छा होती. यासाठी त्यांचा सहाय्यक पंकजशी बोलला, मात्र त्यांनी नकार दिला. राजेंद्र कुमार यांनी याचा आणि पंकजच्या वृत्तीचा भाऊ मनहरशी उल्लेख केला. मनहरने पंकजला हे सांगितल्यावर त्याला खूप वाईट वाटले. त्यांनी राजेंद्र कुमारच्या सहाय्यकाला बोलावून बैठक निश्चित केली. या भेटीनंतर त्यांनी नाम चित्रपटात काम केले आणि चिठ्ठी आयी है आयी है या गझलला आवाज दिला. ही गझल त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गझलांपैकी एक आहे. ही गझल डेव्हिड धवन यांनी संपादित केली होती. राजेंद्र कुमार आणि राज कपूर खूप चांगले मित्र होते. एके दिवशी त्यांनी राज कपूर यांना त्यांच्या घरी जेवायला बोलावले. रात्रीच्या जेवणानंतर पंकज उधास यांच्या आवाजात त्यांनी चिठ्ठी आयी है ही गझल ऐकवली आणि राज कपूर रडले. या गझलमुळे पंकजला खूप प्रसिद्धी मिळेल आणि ही गझल त्यांच्यापेक्षा चांगली कोणीही गाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. हळूहळू पंकजजी गझल गायनाच्या प्रेमात पडले, त्यासाठी ते उर्दू शिकले. एकदा ते स्टेज परफॉर्मन्स देत होते, जिथे त्यांनी आधीच ४-५ गझल गायल्या होत्या. तरुणाई अगदी त्यांच्या गायनावर फिदा झाली होती. तेवढ्यात एक प्रेक्षक त्यांच्याकडे आला आणि त्याने गझल म्हणायची विनंती केली. पंकज यांना त्याची वागणूक आवडली नाही आणि त्यांनी गाण्यास नकार दिला. यावर तो माणूस इतका संतापला की त्याने पंकजच्या समोर बंदूक दाखवून त्यांना गाण्यास सांगितले. त्या माणसाच्या कृत्याने पंकज इतका घाबरला की त्याच्या विनंतीवरून त्यांनी एक गझल गायली.

मुस्लीम मुलीशी लग्न करण्यास कुटुंबीयांचा कोणताही आक्षेप नव्हता. दि.११ फेब्रुवारी १९८२ रोजी पंकजने फरीदासोबत लग्न केले. दोघेही एका कॉमन फ्रेंडच्या लग्नात भेटले होते. पंकजला फरीदा पहिल्या नजरेतच आवडली होती. त्यावेळी तो ग्रॅज्युएशन करत होता आणि फरीदा एअर होस्टेस होती. दोघांमध्ये आधी मैत्री, नंतर प्रेम झाले. दोघांनाही आता लग्न करायचे होते. पंकजच्या घरच्यांचा या नात्यावर कोणताही आक्षेप नव्हता. जेव्हा फरीदाने तिच्या कुटुंबीयांना या नात्याबद्दल सांगितले तेव्हा त्यांनी हे नाते मान्य केले नाही. त्याला आपल्या मुलीचे लग्न दुसऱ्या धर्मात करायचे नव्हते. फरीदाच्या सांगण्यावरून पंकज तिच्या घरी गेला आणि तिच्या वडिलांसोबतच्या नात्याबद्दल बोलला. फरीदाचे वडील निवृत्त पोलीस अधिकारी होते, त्यामुळे पंकज खूप घाबरला होता, पण त्याने आपल्या बोलण्याने त्यांचे मन जिंकले. फरीदाच्या वडिलांनी त्यांच्या लग्नाला होकार दिला. त्यानंतर दोघांनी लग्न केले. त्यांना नायब आणि रेवा या दोन मुली आहेत.

जगप्रसिद्ध गायक पंकजजी उधास यांचा परवा दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात सकाळी ११ वाजता मृत्यू झाला. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. वयाच्या ७२व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याबाबतची माहिती त्यांच्या कुटुंबीयांकडून देण्यात आली होती. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्या मुलीने ही माहिती दिली होती. बहुसंख्य चाहतावर्ग तरुणाई ओक्साबोक्सी, हमसून हमसून आणि ढसा ढसा रडत आहे आणि सोशल मीडियावर हृदयद्रावक पोस्ट करत आहे, पंकज दा, अलविदा! अलविदा!! अलविदा!!!

!! गझल सम्राट पंकजजी उदास यांना हीच भावपूर्ण श्रद्धासुमने !!

**_संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## पायोनियर स्कूल य. मंगेवाडी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**सांगोला । प्रतिनिधी**

खंडोबा बहुउद्देशीय संस्थेच्या पायोनियर इंग्लिश सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल व पायोनियर निवासी गुरुकुल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

आपली मराठी मातृभाषेचा गौरवशाली इतिहास विद्यार्थांना उलगडून सांगून. संस्काराची शिदोरी मराठी भाषेतच असून ती आपण कशी जपली पाहिजे ते विद्यार्थांना पटवून देण्यात आले.डॉ.सी. व्ही. रमन यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विज्ञानामुळे जग खूप जवळ आले असून विकास झपाट्याने होत आहे.विज्ञानाच्या शोधामुळे मानवी जीवन अधिक सुखकर झाले आहे.विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपली अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत झाली आहे.विज्ञानाचे फायदे त्याचबरोबर दुष्परिणाम देखील विद्यार्थांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अनिल येलपले सर होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिनाविषयी तसेच राष्ट्रीय विज्ञान विद्यार्थ्यांनी मराठी व इंग्रजी मधून भाषणे केली.विद्यार्थ्यांनी विविध उपकरणे , विज्ञान प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनाविषयी काटकर मॅडम , सावंत मॅडम व म्हेत्रे मॅडम यांनी माहिती सांगितली. आजचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अनिल येलपले सर माध्यमिक विभागप्रमुख आशुतोष रूपनर सर , प्रवीण कोरे सर प्राथमिक विभाग प्रमुख येलपले मॅडम , राऊत मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती रणदिवे मॅडम यांनी केले तर आभार परवीन तांबोळी मॅडम यांनी मानले

## निर्यातक्षम डाळींब उत्पादनासाठी रोगमुक्त रोपे तसेच उत्तम एकात्मिक व्यवस्थापन आवश्यक - डॉ.सोमनाथ पोखरे

**मंगळवेढा** - शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या म्हणीप्रमाणे जर शेतकऱ्याला निर्यातक्षम डाळिंबाचे उत्पन्न घ्यायचे असेल तर रोपांची निवड अत्यंत महत्त्वाचे आहे. रोप जर कीड व रोगमुक्त असतील आणि सुदृढ असतील तसेच उत्तम एकात्मिक व्यवस्थापन केल्यास निर्यातक्षम फळबाग तयार करणे शक्य होईल. असे प्रतिपादन राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.सोमनाथ पोखरे यांनी केले. आज दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी सलगर बुद्रुक तालुका मंगळवेढा येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा व राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय मंगळवेढा मार्फतनिर्यातक्षम डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश श्रीखंडे, तालुका कृषी अधिकारी मंगळवेढा यांनी केले.त्यानंतर तेलकट डाग नियंत्रण, कळीकुज, फळकुज, मररोग, शॉट होल बोअरर, खोडकिड,अशा विविध संकटांना मात देत मंगळवेढा तालुक्यातील शेतकरी चांगल्या दर्जाची डाळिंबाची शेती करत आहेत. परंतु आताचा काळ एकट्या दुकट्याने शेती करण्याचा नसून गटाच्या माध्यमातून शेतकरी उत्पादक कंपनीच्या



माध्यमातून शेतमालाची प्रतवारी, प्रक्रिया करणे व सर्वात महत्त्वाचे मार्केटिंग करणे अत्यंत गरजेचे आहे. असे प्रतिपादन मदन मुकणे, प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर यांनी केले.राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर येथील निवृत्त शास्त्रज्ञ तथा पूर्व संचालक, डॉ. जोत्स्ना शर्मा यांनी तेलकट नियंत्रण, कळीकुज, फळकुज नियंत्रण, मर रोग त्याची लक्षणे व त्यावरील रासायनिक नियंत्रणाच्या औषधांचे प्रमाण व फवारणीचे वेळापत्रक याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विश्रांती काळामध्ये बागेची घ्यावयाची काळजी विषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ डॉ. मल्लिकार्जुन यांनी सांगितले की पिनहोल बोअरर ही किड डाळिंब बागेत पूर्वी मायनर पेस्ट म्हणून ओळखली जात होती. ती वातावरणातील बदलामुळे मेजर पेस्ट निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर नुकसान करत आहे.या पिनहोल बोअरर किडीच्या नियंत्रण बाबत सविस्तर मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे शंकांचे निरसन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ डॉ.चंद्रकांत अवचारे यांनी लागवड पद्धतीवर मार्गदर्शन केले. व लागवडीचे अंतर कसे असले पाहिजे. तसेच लागवड पद्धतीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दिलीप चव्हाण, सरपंच सूर्यकांत धायगोंडे, माजी सरपंच तानाजी जाधव ,पांडुरंग कांबळे, संजय धायगोंडे, आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. सदर कार्यक्रम वेळी मंडळ कृषी अधिकारी, भागवत सरडे, राजेंद्र भांगे, बालाजी टेकाळे, नितीन रणदिवे तसेच कृषी पर्यवेक्षक, युवराज यादव व दीपक ऐवळे, कृषी सहाय्यक प्रशांत काटे, मंगेश लासुरकर, पांडुरंग चौधरी, किरण मलाबादी, गणेश भागवत, स्वप्नील बळछत्रे आणि बहुसंख्येने डाळींब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.आत्माचे विक्रम सावजी, शैलेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रशांत काटे यांनी केले. व आभारप्रदर्शन राजेंद्र भांगे यांनी केले. त्यानंतर डाळींब उत्पादक शेतकरी संजय धायगोंडे यांच्या डाळींब बागेमध्ये उपस्थीत शेतकऱ्यांना कीड, रोग ओळख व नियंत्रण बाबत सर्व शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

### लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी.. जाहलो खरेच धन्य..ऐकतो मराठी-प्राचार्य हेमंत आदलिंगे

**सांगोला । प्रतिनिधी**

कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो, याचे औचित्य साधून न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये मराठी भाषा गौरव दिन वि. वा.शिरवाडकर ( कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेस प्राचार्य हेमंत आदलिंगे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोक शिंदे,प्रा दीपक खटकाळे, प्रा जयंत जानकर, न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री दिनेश शिंदे सर, उपमुख्याध्यापक नामदेव कोळेकर उपप्राचार्य प्रा.केशव माने, पर्यवेक्षक प्रा.संजय शिंगाडे, पर्यवेक्षक श्री तानाजी सूर्यगंध सर,पर्यवेक्षक श्री दशरथ जाधव सर, कार्यक्रम नियोजन समितीचे प्रमुख प्रा जालिंदर टकले, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा मिलिंद पवार व सौ. स्मिता इंगोले मॅडम, न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक, प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज सांगोलाचे प्राचार्य हेमंत आदलिंगे हे होते, तर प्रमुख



पाहुणे म्हणून जि. प. प्रा. शाळा पुजारवाडी, सांगोलाचे मुख्याध्यापक श्री. संतोष लवटे हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून किमान कौशल्य विभागाचे प्रा चंद्रकांत इंगळे हे लाभले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले संजय लवटे यांनी आपल्या मार्गदर्शन पर मनोगत मध्ये मराठी भाषा गौरव दिन याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की,आजचा दिवस 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून साजरा केला जातो. याचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या मातीला लाभलेलं सरस्वतीच्या मंदिरातील दैदीप्यमान रत्न म्हणजेच, 'कुसुमाग्रज' अर्थातच, महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर. यांच्या जन्मदिनी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्र्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचं योगदान दिलं आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. आपल्या मातृभाषेचा गौरव आणि कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य हेमंत आदलिंगे यांनी मराठी भाषा गौरव दिनाविषयी कृतज्ञता व्यक्त करताना असे म्हणाले की, लाभले आम्हास भाग्य.. बोलतो मराठी.. जाहलो खरेच धन्य.. ऐकतो मराठी.कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेत त्यांना १९८७ सली साहित्य क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट मानला जाणाऱ्या पुरस्काराने म्हणजेच ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. असे सांगितले.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले किमान कौशल्य विभागाचे प्रा.चंद्रकांत इंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की, महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच, कुसुमाग्रज यांचं मूळ नाव विष्णू वामन शिरवाडकर. कुसुमाग्रज यांचा जन्म नाशिक येथे २७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. यांच्या मोठ्या बहिणीचं नाव कुसुम होतं. त्या नावावरुनच त्यांनी कवी म्हणून कुसुमाग्रज हे नाव वापरलं. कुसुमाग्रज यांनी आपल्या आत्मनिष्ठ प्रतिभेनं आणि समाजनिष्ठ भावस्पर्शी लेखणीनं जागतिक दर्जाचं लेखन केलं. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आणि कुसुमाग्रज यांना अभिवादन म्हणून सरकारनं त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला. तेव्हापासून २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो, असे सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा अरुण बेहेरे यांनी केले, प्रास्ताविक मराठी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा सौ. इंदिरा येडगे मॅडम यांनी केले,तर आभार विद्यालयातील मराठी विभागाच्या सौ कविता शिंदे मॅडम यांनी मानले.

# घुग्घूस येथील ग्रामीण रुग्णालयाच्या कामा साठी उर्वरित २ कोटी रुपयांचा निधी मंजुर

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांना फलीत,अंतिम टप्यातील कामाला मिळणार गती

**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील ग्रामीण रुग्णालयाच्या अंतिम टप्यात असलेल्या कामाला गती देण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. परिणामी त्यांच्या प्रयत्नांना फलीत आले असून सदर बांधकामासाठी अर्थसंकल्पीय निधीमध्ये उर्वरित दोन कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे.



चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्घुस नगरपरिषद अंतर्गत नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा प्राप्त होण्याच्या दृष्टीने घुग्घूस येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले होते. याकरिता १० कोटी ५५ लक्ष रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून घुग्गुस ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले. मात्र शासनाचा निधी रखडल्यामुळे सदर काम बंद पडले होते.घुग्गुस शहर कोळसा खाण व वाहतूक, लोह शुद्धीकरण प्रकल्प यामुळे सर्वाधिक प्रदूषित क्षेत्र आहे. त्यामुळे येथील नागरिकांना आरोग्याच्या भीषण समस्या जाणवत आहे. त्यामुळे निर्माणाधीन घुग्गुस ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता सदर रुग्णालयाच्या कामासाठी उर्वरित निधी मंजूर करावा अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना केली होती. त्यानंतर सदर विकासकामासाठी ५ काटी २६ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र यानंतरही मंजुर निधी पैकी दोन कोटी रुपयांचा निधी प्रलंबित होता. त्यामुळे सदर रुग्णालयाचे अंतिम टप्यात असलेले काम मंदावले होते.या रुग्णालयाची येथे अत्यंत गरज आहे. त्यामुळे सदर काम वेळेत पुर्ण व्हावे यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी उर्वरित निधीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर त्यांच्या पाठपूराव्याला यश आले आहे. काल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याचा अंतरिम बजेट सादर केला. या बजेटमधील निधीमध्ये सदर रुग्णालयाच्या कामासाठी उर्वरित असलेला २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर रुग्णालयाचे काम लवकच पूर्ण होऊन ते नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध होणार आहे. निधी मंजूर केल्या बदल आमदार किशोर जोरगेवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, उमुपख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार आरोग्य मंत्री ताणाजी सावंत यांचे आभार मानले आहे.

# पद्मशाली समाजाच्या वतीने विवेक बोढे यांचा सत्कार



**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील पद्मशाली समाजाच्या वतीने नवनियुक्त भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी पद्मशाली समाजाच्या वतीने भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी अनिल मंत्रिवार, सुषमा चिप्पावार, वंदना मुळेवार, विजया गुडला, रमादेवी येनगद्दलवार, पुनम बंडिवार, किरण कटकुरवार, पुजा येनगंद्दलवार, सोनाली येनगंद्दलवार, शशिकला बंडिवार, स्वरूपा मुशम, रेखा मंत्रिवार, माधुरी बोम्मावार, शोभा पप्पूलवार, शंकर कटकूरवार व समाज बांधव उपस्थित होते.

# सेंट जॉन हायस्कूल मध्ये नॅशनल विज्ञान दिवस साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालयात २८ फेबुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला.

भारताचे महान वैज्ञानिक डॉ. सी. वी रमन इफेक्टचा शोध लागल्याने दर वर्षी २८ फेब्रुवारी ला राष्ट्रीय विज्ञान दिवस (नॅशनल सायन्स डे )साजरा किला जातो तसेच विज्ञानाच्या फायदया- बद्दल समाजात जागरुकता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात येतो.या दिवसाचे औचित्य साधून दि. २८ फेब्रुवारी २४ ला सेंट जॉन हायस्कूल मध्ये विज्ञान प्रदर्शनी तसेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी आपल्या बौद्धिक पातळीचा वापर करून वेगवेगळे विज्ञानावर आधारित मॉडेल्स्, तयार करून प्रदर्शित केले. प्रसंगी



शाळेचे प्राचार्य संताष यादव, उपप्राचार्य भारती कुरझड़कर आणि उपप्राचार्य महेंद्र भोयर हे प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत प्राचार्य संतोष यादव यांनी आपल्या संबोधनात मुलांना. भारतातील यशस्वी अशा शास्त्रज्ञांचे उदाहरण देऊन त्यांना प्रोत्साहीत केले. आणि त्यांच्या अथक प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन श्रावनी बुल्ले भाणि वेदांत वर्हाडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय कला व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञान विभागातर्फे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. मंचावर विज्ञान विभाग प्रमुख डॉ. अंकुश वाकोडे,अंतर्गत गुणवत्ता हमी सेल समन्वयक डॉ. अशोक दवंडे,राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषद समन्वयक डॉ. योगेश बनगिनवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समीर बगाडे यांनी केले तर आभार प्रा. शकील खान यांनी मानले.



याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. विलास हाडगे यांनी विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी माझे योगदान कसे असेल? याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा; असा मौलिक सल्ला दिला. डॉ. अशोक दवंडे यांनी स्वदेशी तंत्रज्ञान म्हणजे काय? हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तर डॉ. बनगिनवार यांनी आजचे विद्यार्थी हेच उद्याचे वैज्ञानिक आहेत असे प्रतिपादन केले तर डॉ. अंकुश वाकोडे यांनी विकसित भारतासाठी विज्ञान कसे महत्त्वाचे ठरू शकते? याविषयी मार्गदर्शन केले.भारत सरकारच्या २०२४ मधील विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान या संकल्पनेवर आधारित पोस्टर व मॉडेल प्रदर्शनीचे आयोजन गणित, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर सायन्स, भौतिकशास्त्र, जीवरसायनशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे करण्यात आले. प्राणीशास्त्र विभागातर्फे रांगोळी प्रदर्शन, वनस्पती शास्त्र विभागातर्फे आयुर्वेदिक वनस्पती प्रदर्शन तसेच रसायनशास्त्र विभागातर्फेपी. पी. टी.प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या सर्व उपक्रमांमध्ये असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनील वाठोरे, डॉ. सचिन भोयर, डॉ. जयंत बुराडे, डॉ. मनीषा गुल्हाने, डॉ. दीप्ती कडू, डॉ. अबोली शिरसागर, डॉ. नंदकिशोर वरघट डॉ. अजय जाधव, प्रा. जावेद शेख, प्रा. प्रियंका आगलावे, प्रा. चैताली भोयर व प्रा. विवेक जेधे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# गुरुदेव महिला भजन मंडळाचा सक्रिय सहभाग



**चिमूर । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या चीचाळा (कु) येथील गुरुदेव महिला भजन मंडळाचा सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेत असतात.

नुकतेच गावात झालेल्या गुरुदेव पुण्यतिथी महोत्सव सक्रिय सहभाग होता. या महोत्सवात तिनही दिवस या भजन मंडळाने उत्कृष्ट कार्य केले आहे. या भजन मंडळाच्या कार्यकर्ता व पदाधिकारी यांनी ग्राम स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेतलेला आहे यासोबतच धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेत विविध ठिकाणी भजन सादर करत असतात. समाजातील विविध कार्यक्रमात नेहमीच पुढाकार घेऊन ते काम तडीस नेण्याचा प्रयत्न करत असतात. अशा या भजन मंडळांचा पुण्यतिथीच्या कार्यक्रमाप्रसंगी सत्कार करण्यात आलेला आहे. मागील पंचवीस वर्षापासून ग्रामस्वच्छता अभियान, जनजागृती, हुंडाबळी, दारू बंदी, व्यसनमुक्ती, केंद्र पंढरपूर आषाढी यात्रा, गुरुदेवाची सामुदायिक प्रार्थना, महाकाला उत्सव आदी कार्यक्रमात गावोगावात जाऊन जंनजागृती पर कार्यक्रम घेत असतात या भजन मंडळाचे सदस्य वनिता चौधरी, अंतकला भीवणकर, मनीषा ढोरे, सुमित्रा चौधरी मीना येवले कुंदा मंगर, सविता येवले, उषा धोटे, जनाबाई ठाकरे आधी सहभाग घेत असतात.

# श्री बागेश्वर धाम सेवा समिती कडून संगीतमय सुंदरकांड आणि भव्य महाप्रसादाचे आयोजन

**वर्धा । प्रतिनिधी**

शहरातील हनुमान टेकडी मंदिरात श्री बागेश्वर धाम सेवा समिती वर्धा जिल्ह्याच्या वतीने संगीतमय सुंदरकांड ,हनुमान चालीसा कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते, सोबतच सर्व भाविक भक्तांना भव्य महाप्रसादाचे सुद्धा वितरण करण्यात आले. मंगळवारी २७ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते दरम्यान भक्तिमय स्वरूपाची महाआरती आणि संगीतमय वातावरणात हनुमंताची पूजा करण्यात आली होती.




यावेळी वर्धा जिल्ह्यातील साधू संत ,भक्तगण , प्रतिष्ठित व्यक्ती ,धार्मिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांची तसेच श्री बागेश्वरधाम सेवा समितीच्या सदस्यांची व मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. येत्या १ ते ८ मार्च २०२४ ला श्री बागेश्वर धाम पीठ च्या वतीने मध्यप्रदेश येथील छतरपूर जिल्ह्यात १५१ सामूहिक कन्या विवाह महोत्सव आणि १०८ कुंडीय अति विष्णु महायज्ञ आयोजित होणार असल्याची माहिती श्री बागेश्वर धाम सेवा समिती वर्धा च्या पदाधिकाऱ्यांनी दिली .

# पंकजा मुंडेंकडे नवी जबाबदारी; २३ लोकसभांसाठी निवडणूक निरीक्षकांची घोषणा

**मुंबई**–भारतीय जनता पक्षाच्या वतीने २३ लोकसभा निवडणूक निरीक्षकांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजा मुंडे यांच्याकडे उत्तर मुंबई, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे उत्तर पूर्व तर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे बीड लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपच्या या यादीमुळे आगामी लोकसभा निवडणुकीत ज्येष्ठ मंत्र्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. २९ फेब्रुवारी रोजी भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. या बैठकीनंतर देशातील लोकसभेच्या निवडणुकीसाठी १०० उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीआधी या निरीक्षकांना जबाबदारी देण्यात आलेल्या मतदार संघातून विद्यमान खासदार आणि त्याला पर्यायी दोन उमेदवारांची नावे द्यायची आहेत. या माध्यमातूनच लोकसभा निवडणुकीत तिकिटांचे वाटप होणार आहे. त्यामुळे आता आधी चर्चा सुरु होती, त्या प्रमाणे पंकजा मुंडे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि वनमंत्री सुधीर मुनत मुगंटीवार हे आगामी लोकसभा निवडणुकीत उमेदवार नसतील, हे जवळपास निश्चित झाले आहे. आजी-माजी मंत्र्यांनाच भाजप लोकसभा निवडणुकीत उतवरणार असल्याची या आधी चर्चा रंगली होती.



सध्या वसंत ऋतू चालू असुन पळस या वनस्पतीने नवीन शालु परिधान केला आहे. मनमोहक फुलांचा गंध सर्वत्र दरवळतो आहे.तेव्हा वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे!असे सुविचार मनात आल्याशिवाय राहत नाही. छाया :प्रणय बांगरे.

# सेंट जॉन हायस्कूलमध्ये मराठी दिवस उत्साहात साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञानप्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मराठी दिवस उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. २७ फ्रेब्रुवारी हा दिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो.या दिवसाला मोठे महत्व आहे. ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो.




कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे होते. तसेच शाळेचे प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्य आरती कुरझड़कर यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रसंगाला अनुसरून विद्यार्थानी विविध कलात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. जसे पोवाडा, नृत्य, नाटिका,जाहिरात इ. तसेच शिवाजी महाराजांच्या जिवनावर आधारित नाटिका सादर करण्यात आली.प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे यांनी आपल्या संबोधनात विदयार्थांना असा संदेश दिला की ज्ञान प्राप्तीची धून असावी, सत्याच्या मार्गाने चला. जिजामातेने जसा शिवाजी घडविला तसाच देशातील प्रत्येक बालक हा शिवाजी सारखा झाला पाहिजे.तसेच प्राचार्य संतोष यादव यांनी आपल्या मार्गदर्शनपर संदेशात असे सांगितले की आपला देश हा बहुभाषिय देश आहे, विविध संस्कृतिने नटलेला देश आहे.तरी मातृभाषेचा अवलंब करा, मातृभाषा प्रगल्भ करा. प्रगती करायची असेल तर कुठल्याही एका भाषेमध्ये प्राविण्य केले पाहिजे. कारण सरकारी आदेशानुसार पुढे प्रवेशात्मक परिक्षा ही आपल्या मातृभाषेत करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे व्यवस्थापन राहुल माजरखेडे यांच्या निर्देशनात झाले. कार्यक्रमाचे संचालन कृष्णा धांदे आणि नंदिनी गाधने तर आभार संस्कृती अवसरे यांनी केले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता, शाळेतिल सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.८

# महात्मा फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात निवडणूक साक्षरता क्लबची स्थापना

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

महात्मा फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय तळोधी बाळापुर तालुका नागभीड जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी साक्षरता क्लब ची स्थापना करण्यात आली.

आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष महात्मा फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक जी.जे.बुलबुले होते. प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक पी.एम.कोहपरे,ज्येष्ठ अध्यापक जी.के.उगेमुगे , जी.झेड.मांढरे उपस्थित होते.निवडणूक साक्षरता क्लबच्या अंतर्गत विद्यार्थ्यांमधून आदेश सुभाष नान्हे याची अध्यक्ष पदावर निवड करण्यात आली तसेच शारदा अनिल देवगिरीकर,सचिव, दिशा विलास लांजेकार,उपाध्यक्ष, शर्वरी रवींद्र शिवणकर, संघटक म्हणून निवड करण्यात आली.निवडणूक साक्षरता क्लब अंतर्गत झालेल्या कार्यक्रमात जी के.उगेमुगे , जी.झेड. मांढरे तसेच पी.एम. कोहपरे यांनी विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती बद्दल मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. जे.बुलबुले सर यांनी लोकशाही म्हणजे काय, मतदानाचे महत्त्व काय, समाजात मतदानाबद्दल जागृती करणे का आवश्यक आहे, मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. या पद्धतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. दैवत आर. बोरकर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन शारदा अनिल देवगिरीकर हिने केले.कार्यक्रमाला विद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## सरसकट जुनी पेंशन योजना लागू करा

# आमदार सुधाकर अडबाले यांची राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील शाळांमधील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त राज्यातील सर्व शिक्षक - कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्याकडे आमदार सुधाकर अडबाले यांनी भेट घेत केली.



२०२४ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन २६ फेब्रुवारीपासून सुरू झाले. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मंत्रालयात आमदार सुधाकर अडबाले यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली.दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळा व तुकडीवर कार्यरत राज्यभरातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नवीन पेंशन योजना लागू करण्यात आली. नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊनही राज्यातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्यात आली नाही. हा सदर कर्मचाऱ्यांवर झालेला फार मोठा अन्याय आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे भविष्य असुरक्षित झालेले असून सरकारच्या या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांत तीव्र नाराजी आहे. ही नाराजी ते रस्त्यावर उतरून वेळोवेळी सरकारला दाखवित आहे. मात्र, सदर कर्मचाऱ्यांच्या मागणीकडे राज्य सरकार दुर्लक्ष करीत आहे.तसेच १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त राज्यातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी व पेंशन योजनेचे संरक्षण करावे, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेद्वारा 'व्होट फॉर ओपीएस' नागपूर ते मुंबई संकल्प पदयात्रा काढण्यात येत आहे. या यात्रेचा समारोप मुंबई येथील आझाद मैदानावर २८ फेब्रुवारी २०२४ रोजी होणार आहे. या संकल्प यात्रेत राज्यातील मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झालेले आहेत.दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील शाळांमधील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त राज्यातील सर्व शिक्षक - कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी राज्याचे अर्थमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्याकडे केली. सदर विषयावर मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत सविस्तर चर्चा केली. सोबतच शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले उपस्थित होते.

## इको-प्रोने मानले जिल्हाधिकाऱ्यांचे आभार

### रामाळा तलाव संवर्धनासाठी निधी मंजूर;एसटीपी आणि रिटेनिंग वॉल बांधकामासाठी ९.३ करोड रुपये

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रामाळा तलाव संवर्धनासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी ९.३ करोड रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून एसटीपी आणि रिटेनिंग वॉल बांधकाम करण्यात येणार आहे. ही मागणी मान्य केल्याबाबत इको-प्रो संस्थेने जिल्हाधिकारी यांचे आभार मानण्यात आले.



२०२१ मध्ये इको-प्रोने रामाळा तलाव सत्याग्रह-आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर तलावाचे खोलीकरण करण्यात आले. मात्र, एसटीपी आणि रिटेनिंग वॉल बांधकामासाठी निधी उपलब्ध नव्हता. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी इको-प्रो पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार खनिज विकास निधी अंतर्गत एसटीपी आणि रिटेनिंग वॉलच्या बांधकामासाठी ९.३ करोड रुपये मंजूर केले आहेत. या निधीमुळे रामाला तलाव संवर्धनाचा महत्वाचा टप्पा पूर्ण होण्यास मदत होईल. इको-प्रोच्या शिष्टमंडळाने पुष्पगुच्छ देऊन जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले. शिष्टमंडळात बंडू धोतरे, अभय बडकेलवार, सेवानिवृत्त वनाधिकारी, नितीन रामटेके, अब्दुल जावेद आणि भारती शिंदे उपस्थित होते.

## शासन आपल्या दारीच्या नावाखाली महायुती कडून जनतेला गाजर

### विरोधकांकडून विधि मंडळाच्या पायऱ्यांवर सरकारचा जोरदार निषेध

**मुंबई**-राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशीही कामकाज सुरू होण्यापूर्वीच विधिमंडळ परिसरात विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला. 'शासन आपल्या दारी आले, मिळाले गाजर, 'कांद्याचा करून वांदा, महायुतीने दिले गाजर','शेतकऱ्यांनी मागितली मदत, सरकारने दिले गाजर,' 'कापसाला पाहिजे होता हमीभाव, मिळाले गाजर, म्हणत सरकारच्या विरोधात विधिमंडळ परिसरात जोरदार निदर्शने केली.



राज्यातील जनतेला विकासाचे दिवा स्वप्न दाखवणाऱ्या ट्रिपल इंजिन सरकारने राज्यातील शेतकरी, मजूर, कामगार, विद्यार्थी, महिला , बेरोजगार यांना वेळोवेळी विकासाच्या नावाखाली गाजर दाखवले आहे. म्हणून, विधानसभा आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि महाविकास आघाडीच्या आमदारांनी हातात गाजर घेत सरकारचा निषेध केला. दरम्यान, कापसाची माळ घालून आक्रमक होत सरकारविरोधात विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी याप्रसंगी शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, कापूस, सोयाबीन, धान, संत्रा उत्पादक शेतकऱ्यांला फसवणाऱ्या सरकारचा,कांद्याची निर्यातबंदी करणाऱ्या सरकारचा धिक्कार असो अशा घोषणा देत विकासाच्या नावाखाली राज्यातील जनतेची घोर फसवणूक करणाऱ्या फसव्या सरकारचा निषेध केला.काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते सतेज बंटी पाटील, काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड,डॉ. विश्वजित कदम, अमित देशमुख ,अभिजित वंजारी, जयश्री जाधव, नितीन राऊत, अनिल देशमुख , सुनील भुसारा, अशोक पवार, यांच्यासह विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्यात विकासाच्या नावाखाली घोर फसवणूक करणाऱ्या सरकारच्या विरोधात 'शासन आपल्या दारी आले, मिळाले गाजर, 'कांद्याचा करून वांदा, महायुतीने दिले गाजर', 'शेतकरयांनी मागितली मदत, सरकारने दिले गाजर,' 'कापसाला पाहिजे होता हमीभाव, मिळाले गाजर,घोषणा लिहिलेले फलक हातात घेत जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

# जिल्हयात १ लक्ष ५५ हजार ४३५ बालकांना पोलिओ डोज देण्याचे उद्दिष्ट

### ३ मार्च रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ;जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य यंत्रणेचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दोन थेंब प्रत्येकवेळी....पोलिओ वर विजय दरवेळी' या संकल्पनेनुसार रविवार दि. ३ मार्च रोजी पल्स पोलिओ मोहीम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील ० ते ५ वयोगटातील १ लक्ष ५५ हजार ४३५ बालकांना पोलिओ डोज देण्याचे उद्दिष्ट आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि.२८) आढावा बैठक घेतली.




यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ललित पटले, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, जागतिक आरोग्य संघटनेचे सर्व्हिलन्स मेडीकल ऑफिसर डॉ. साजिद, जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिचारिका सुरेखा सुपराळे, सुरेखा ठाकरे आणि भावना सोंडवल आदी उपस्थित होते.याप्रसंगी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, पल्स पोलिओ लसीकरणापासून ० ते ५ वयोगटातील एकही बालक वंचित राहता कामा नये. बाहेरून स्थलांतरीत झालेले नागरिक किंवा वस्त्यांवर विशेष लक्ष द्यावे. जेथे लसीकरण कमी होते, अशा ठिकाणांना आरोग्य विभागाच्या अधिका-यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन जनजागृती करावी. तालुकास्तरावरही कार्यालय प्रमुखांनी लसीकरण मोहिमेबाबत बैठक घेऊन योग्य नियोजन करावे, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. भारतात एकही पोलिओग्रस्त रुग्ण आढळणार नाही, याकरीता यावर्षीसुध्दा शासनातर्फे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची एकच फेरी दिनांक ३ मार्च २०२४ रोजी राबविण्यात येत आहे. या दिवशी ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना बुथवर पोलिओ लस पाजण्यात येणार आहे व १०० टक्के बालकांना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे.जिल्ह्यात २३४९ लसीकरण केंद्रे व २६२ मोबाईल टीम : पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत ग्रामीण भागात २११७ लसीकरण केंद्रे, शहरी भागात ८८ व महानगरपालिका क्षेत्रात १४४ अशी एकूण २३४९ लसीकरण केंद्रे स्थापन करण्यात करण्यात आली आहेत. या व्यतिरीक्त प्रवासात असलेल्या बालकांना, स्थलांतरीत होत असलेल्या बालकांना व निवासाची व्यवस्था नसलेल्या बालकांना पोलिओ लस मिळावी याकरीता ग्रामीण भागात १९० मोबाईल टिम, शहरी भागात २१ व महानगरपालिका क्षेत्रात ५१ अशा २६२ मोबाईल टिमची व्यवस्था केलेली आहे. तसेच टोलनाका, बसस्टॉप, रेल्वेस्टेशन, यात्रास्थळे या ठिकाणीसुध्दा ट्राझिंट टिमव्दारे लसीकरणाची व्यवस्था केलेली आहे.भारत २०११ पासून पोलिओ मुक्त : पोलिओ रोगाचे निर्मुलन करण्याचे हेतुने भारत सरकार १९९५पासून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवित आहे. तसेच नियमित लसीकरण, ए.एफ.पी. सर्व्हेक्षण व पोलिओ रुग्ण आढळल्यास मॉप अप रॉउंड याव्दारे पोलिओ रुणांच्या संख्येत लक्षणीय घट झालेली आहे. देशात १३ जानेवारी २०११ नंतर अद्यापपर्यंत पोलिओचा एकही रुग्ण आढळलेला नाही. पोलिओ निर्मुलन कार्यक्रमाची सुरुवात झाल्यापासुन प्रथमच अशा पध्दतीने यश मिळालेले आहे. जानेवारी २०१४ मध्ये भारताला पोलिओ निर्मुलन प्रमाणपत्र मिळाले आहे

## कृषी सेवा परीक्षेतील २०२ उमेदवार नियुक्तीच्या प्रतीक्षेत:उमेदवारांना तात्काळ नियुक्ती द्या-वडेट्टीवार

**मुंबई**-महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षामधून एकूण २०२ उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोग मधून करण्यात आली आहे. या उमेदवारांना मागील ७ महिन्यापासून नियुक्ती न दिल्याने ते दोन दिवसापासून आझाद मैदानात बेमुदत आंदोलनाला बसले आहेत, या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश तात्काळ द्यावेत, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली आहे. कृषी उपसंचालक (वर्ग १) १९, तालुका कृषी अधिकारी (वर्ग २)-६१, मंडळ कृषी अधिकारी (वर्ग २)-१२२ अशा एकूण २०२ उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोग मधून करण्यात आली आहे. यासर्व



उमेदवारांची कागदपत्रे दिनांक १७ व १८ ऑगस्ट, २०२३ रोजी तपासून पूर्ण झालेली असूनही मागील ७ महिन्यापासून यांच्या नियुक्तीची प्रक्रिया कृषी विभागाकडून अजूनही पूर्ण झालेली नाही. यामुळे या उमेदवारांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे.या उमेदवारांना मागील ७ महिन्यापासून नियुक्ती न दिल्याने ते दोन दिवसापासून आझाद मैदानात बेमुदत आंदोलनाला बसलेले आहेत. या नियुक्त्या रखडल्यामुळे अकोला तसेच अनेक जिल्ह्यात उपविभागीय कृषी अधिकारी या पदांचा पदभार द्यायला त्या दर्जाचे अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा पदभार खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने यासंदर्भात तातडीने कार्यवाही करुन या २०२ उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश तात्काळ काढण्यात यावेत, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. सरकारकडून याबाबत सकारात्मक उत्तर देण्यात आले.

## महायुती सरकारचा अंतरिम अर्थसंकल्प फसवा आणि दिशाहीन-वर्षा गायकवाड

**मुंबई**-अस्मानी संकटामुळे अडचणीत सापडलेला बळीराजा, वाढत्या महागाईने त्रस्त दीनदलीत, गोरगरीब, अल्पसंख्यांक, आदिवासी, महिला वर्ग, बेरोजगारीने हताश युवा वर्गाला अर्थसंकल्पाकडून मोठी अपेक्षा होती परंतु महायुती सरकारच्या अंतरिम अर्थसंकल्पाने त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे. अर्थसंकल्पात मोठमोठ्या घोषणांचा वर्षाव करण्यात आला असून दूरदृष्टीचा अभाव दिसून आला आहे. हा अंतरिम अर्थसंकल्प महसुली तुटीचा, गतिहीन, नीतिहीन, कृतिहीन फसवा आणि दिशाहीन अर्थसंकल्प आहे, अशी टीका मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष प्रा. वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

महायुती सरकारने सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना प्रा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, आर्थिक शिस्तीचे पायंडे मोडून अंतरिम बजेटच्या नावाने जवळपास पूर्ण बजेट मांडताना सरकारने उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ न ठेवता 'मित्र कंत्राटदाराचे खिसे भरा' योजनेअंतर्गत कंत्राटदारचलित प्रकल्पांचा भडिमार केला आहे. अर्थसंकल्पात अनेक महापुरूष, संत-महात्म्यांची नावे घेण्यात आली आहेत. सरकारच्या ढासळत्या प्रतिमेला सावरण्यासाठी लोकभावनांना हात घालण्याचा हा प्रयत्न आहे. महापुरूष व संत महात्म्यांची नावे घेण्याऐवजी त्यांच्या विचारधारेचे अनुकरण केले तर ते महाराष्ट्राच्या आणि जनतेच्या अधिक हिताचे ठरू शकेल.लवकरच लोकसभा निवडणुका होत आहेत. भारतीय जनता पक्ष, शिंदे शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या कारभारला जनता कंटाळलेली आहे. ही जनता निवडणुकीची वाट पहात आहे, निवडणूक लागताच जनता या ट्रिपल इंजिन सरकारला त्यांची जागा दाखवेल हे लक्षात आल्यानेच सर्व समाज घटकांना खूष करण्यासाठी वारेमाप घोषणा करण्यात आलेल्या आहेत. या सरकारचा अनुभव पाहता यातील एकही घोषणा पूर्ण होणारी नाही. वास्तविक पाहता अर्थसंकल्प हा राज्याच्या विकासाला चालना देणारा असायला हवा परंतु तो निवडणूक जुमल्यांचा निघाला, असेही वर्षा गायकवाड म्हणाल्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .